**22**

# किनवट – माहुर परिक्षेत्रातील आदिवासी समाजाचा शैक्षणिक विकास : एक अभ्यास

**डॉ. डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

************

एका विशिष्ट भुभागावर वास्तव्य करणारा, एकसमान बोलीभाषा बोलनारा, समान संस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानिक जीवन जगणारा पण अक्षर ओळख नसलेला स्थानिक गटाचे एकीकरण म्हणजे आदिवासी समाज होय. अशी न्यायाचा भारतीय राज्यघटनेमध्ये केलेली दिसून येते. घटनेच्या कलम ३६६(२५) तसेच ३५४ मध्ये आदिवासी जमाती बाबत स्पष्ट विवेचन केलेल आहे. आदिवासी समाजाच्या हितांचे संरक्षण व संवर्धन करण्याची संपूर्ण काळजी घटनाकाराणी घेतलेली आहे. विविध शासनाच्या कल्याणकारी योजना मधून दिसून येते.

कलम २४४ नुसार आदिवासी क्षेत्राबाबत विवेचन केलेला आहे. नांदेड जिल्हा हे महाराष्ट्रातील एक प्रसिध्द ऐतिहासकि ठिकाण आहे. याच जिल्हायातील किनवट—माहुर हे प्रसीध्द असे सातमाळा डोंगररांगानी व्यापलेले आदिवासी क्षेत्र आहे. घनदाट—जंगल दऱ्या डोंगररांगानी व्यापलेल्या या भुभागात पैनगंगा नदीचे खोर आहेया खोऱ्यातल बहुसंख्य आदिवासी समाज खेडयात वसलेली आहे.

गोंड, कोलाम, आंध, परधान या आदिम जमातीचा भुभागामध्ये ज्यास्तकरून राहतात. या गोंडाची कोथा बोली, तर कोलामी, आंध, परधान अशा मराठी बोलीभाषा स्थानिक पातळीवर आहेत. त्याच्या विकासासाठी अनुदान वितरीत करण्यात येते.

या भागातील कोलाम कोलांना पारंपारीक व्यवसाय बांबुपासून टोपल्या, सुप डाली, चटई बनविने हा आहे. आजही ते जंगली वस्तु—वनवतात तसेच सर्वच आदिवासी जमाती शारीरिक श्रमाची कामे करतात जंगलावर आबादित जीवन जगतात.

गोंड हि प्राचीन प्रोटो ऑस्टोलाईड प्रजाती आहे. त्यांना द्रविड वंशीय समजल्याजाते. येथे गोंड वंशाप्रमाणेच प्रधान ही आदिमजात आहे. निसर्ग पुजन व धर्मकल्पनेतून त्यांचे वेगळेपण डोळया समोर येते. गोंडाच्या धार्मीक विधीकार्यात 'भाट' म्हणुन कार्यकरण्याची जबाबदारी परधानावर असते. सण—वार—उत्सव विधी यातून त्यांचे धार्मीकत्व डोळयासमोर येते. प्रधाना प्रमाणेच आंध जमात येथे निवास करते. आंध हे निसर्ग पुजक आहेत. ते अनाकालनीय व्यक्तीला ईश्वर मानतात. आंध या प्रमाणेच 'कोलाम' ही प्राचीन मागासलेली आदिम जमात दिसून येते. कोलाम व्यक्ति स्वत:ला 'कोलावान' असे म्हणतो. कोलामी भाषा द्रविडी आहे. त्या भाषेला लिपी नाही गोंदन करणे हे आदिवासी जमातीचे खास लक्षण आहे. येथील आदिम जातींचे संशोधन देशाच्या विकासाचे आहे.

प्रस्तुत शोध निबंधात किनवट—माहुर एकंदरित आदिवासी समाजाच्याविकासात्मक कल्याणकारी योजनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. या मध्ये राज्यघटनेने दिलेले संरक्षण याचे विवेचन तसेच विविध योजना त्यांचा लाभ व विकास यावर एक दृष्टीशेप टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनासाठी योजलेली पध्दती**:—किनवट—माहुर आदिवासी परिक्षेत्रातील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकास एक अभ्यास या संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची उदिष्टये**:—सदरील संशोधन निबंधची महत्वपूर्ण उदिष्टये खालील प्रमाणे आहे.

१) राज्यघटनेतील आदिवासी समाजाच्या कल्यानकारी योजनाचा आढावा घेणे.

२) आदिवासी समाजाची आर्थिक स्थिती जाणुन घेणे

३) शैक्षणिक, कलयाणकारी योजनाचा अभ्यास व त्याचा लाभ याची माहिती घेणे.

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
July To Sept. 2021
Issue-39, Vol-06


**संशोधानाची गृहीत कृत्य:–**

१) किनवट–माहुर आदिवासी परिक्षेत्रातील समाजात भौतिक सुविधाचा अभाव दिसून येतो.

२) शासनाच्या विविध योजनांची माहीती तळागाळापर्यंतच्या आदिवासी व्यक्ती पर्यंत पोहोचलेली दिसत नाही.

३) ये आदिवासी योजनाचा पूर्ण लाभ आदिवासीना घेता आला नाही. त्यामुळे मागासलेला दिसून येतो.

४) दारिद्रय व कर्जबारीपणा गरीबी अज्ञान व बालमजुरी प्रमाण दिसून येते.

**नमुना निवड पध्दती:**–नांदेड जिल्यातील किनवट–माहुर तालुक्यामध्ये लोकसंख्येचे प्रमाण आधिक दिसून येते. किनवट तालुक्यात सर्वधिक संख्या असलेल्या ०४ खेडया आदिवासी गावाला १०. उत्तरदात्याची त्यांची निवड केली. ०४ X १०=४०मुलाखत अनुसुची भरून घेण्यात आल्या आहेत.

**तथ्य संकलनाची साधने:**–प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करणसाठी तथ्य संकलनाच्या दोन्ही स्त्रोतांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**संशोधन विषयाचे महत्व:**–नांदेड जिल्हयातील आदिवासी बहुल असलेल्या किनवट–माहुर परिक्षेत्रातील आदिवासी समाजांची एकूण स्थीती व शासकिय योजनांचा लाभ त्यांच्या शैक्षणिक समस्याचा उहापोह पुस्तुत शोध निबंधामध्ये करण्यात अलेला आहे.

**संशोधन विषयाची व्याप्ती वयमर्यादा:**–आदिवी समाजाच्या विकास घडवून आननाऱ्या शासनाच्या सर्व शैक्षणिक व कल्यानकारी योजनांना लाभ यांची माहीती इ. संशोधन मर्यादा निश्चित केलेली आहे.

**कालमर्यादा:**–प्रस्तुत शोधनिंबधात संशोधकाने आदिवासी समाजाच्या विकास योजनांचा २०१८ ते २०२० काळातील संशोधन केलेले आहे.

**राज्यघटनेतील तरतुदी:–**

घटनेतील कलम २४४,२७६ नुसार विविध आर्थिक सुधारणा उपाययोजना केंद्र सरकारने सूचना केल्या आहेत १२ ते ३५ मुलभुत अधिकारामध्ये शैक्षणिक–सामाजीक सांस्कृतिक अधिकारबाबत विविध योजनांचा देखील तरतुदी केलेल्या आहे. कलम १३३,३३२,३३४,२४३,(B)यानुसार राजकिय आरक्षणचे लाभ आदिवासी समाजाला राज्यघटनने दिलेले आहे. त्यानुसार आदिवासी परिक्षत्रात या आधिकारांचा वापर आदिवासी घेताना दिसून येतात

**अनुसुचीत जमातीसाठी शैक्षणिक कल्यानकारी योजना :–**

**शिक्षणाच्या योजना:**–किनवट परिक्षेत्रात आदिवासी समुदायाचा शैक्षणिक मागासलेपणा दुराव्हावा यासाठी विभागीय आदिवासी कार्यालयाची येथे स्थापन करण्यात आली आहे.

**१) शिक्षण–फी–माफी:**–शासनाने सर्व राज्यातील अनुसुचीत जातीच्याा विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण–फी माफ केली. मुलभुत शैक्षणिक विकास करणे, साक्षरतेचे प्रमाण वाढविने हा त्यामागचा मुख्य उदिष्ट आहे.

**२) पुस्तक पेठी योजना:**–अनुसुचीत जामातीच्या विघ्यार्थ्याची पुस्तकाची गरज पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने मोफत पुस्तक योजना सुरू केली किनवट–माहुर परिक्षेत्रातील शिक्षण घेणाऱ्या सर्व मुला–मुलींना त्याचा लाभ मिळालेला दिसून येतो.

**३) वस्तीग्रह योजना:**–तिसऱ्या पंचवार्षीक योजनामध्ये आदिवासी मुला–मुलीसाठी होस्टल बांधण्यास सुरवात झाली–१९६९–९० पासून करण्यात आली १० व्या योजनेत दोन्ही योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले या योजनेमुळे किनवट–माहुर परिसरातील आदिवासी आश्रम शाळांची सुरवात झालेली आहे. त्यामुळे शैक्षणिक दृष्टया वंचीत असलेल्या या समाज ज्ञानाची वृध्दी होतांना दिसून येते. अनेक आदिवासी –मुलाना शासनाच्या या योजनांचा मोठा लाभ झाल्याचे दिसून येतो.

**शिक्षणासाठी शिष्यवृत्ती** :–आदिवासी परिक्षेत्रातील बोधडी येथील आदिवासी आश्रमशाळा, पिपळगाव येथील किनवट येथील अशा अनेक आश्रमशाळा तसेच आदिवासी शाळेतील मुलांना प्रत्येक वर्षी शालांत परिक्षेनंतर शिष्वश्त्ती देण्यात येते याचा लाभ हजारो आदिवासी मुलांनी झाल्याचे दिसून येते.

**राजीव गांधी फेलाशिप** (२००५–०६):– अनुसुचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी

अर्थ सहाय देण्यात येतो. किनवट परिक्षेत्रात कै. उत्तमराव राठोड आदिवासी संशोधन केंद्र आहे. अनेक आदिवासी विद्यार्थीना शिक्षण संशोधनाची संधी उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

**परदेशात शिक्षण घेण्याची संधी** :—१९४५—५५ आदिवासी परिक्षेत्रातील मुलांसाठी (ST) परदेशाता जाऊन शिक्षण घेण्याची सुविधा देखील शासनाने निर्माण केलेली आहे. या संधीचा लाभ अनेक आदिवासी विद्यार्थ्यी घेताना दिसून येतात वैद्यकिय शिक्षण घेतात. हि राष्ट्रीय स्कॉरलाशिप आभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणाची दारे खुली झालीआहे. आदिवासी मुलांना विदेशात शिक्षणासाठी विदेशात स्कॉलरशिप योजना निर्माण केली.

**पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिप** :—मेरीटचे वर्जावर्धन योजना या योजनेचा लाभ १९४५—४५ पासून आदिवासी समाजासाठी योजना शासनाने बनविलेली आहे. हजारो आदिवासी विद्यार्थ्यी याचा लाभ घेतल्याचे दिसून येते या मुळे उच्च माध्यमीक पदवी पदव्युतर शिक्षणाचे प्रमाण वाढले.

**व्यावसायिक प्रशिक्षण** :—१९९२—९३ पासून या योजनेची सुरूवात झालेली आहे. २००९ मध्ये यात बदल करण्यात आलेला दिसून येतो, रोजगारात वाढ करण्यासाठी कौशल्य विकासावर भर देण्यात आलेला आहे.या योजनेमुळे किनवट तालुक्यातील अनेक आदिवासी विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला त्यामुळे ते आर्थिक दशष्टीने स्वावलंबी बनलेली दिसून येतात. व्यावसायिक शिक्षणामुळे सुशिक्षित आदिवासी तरूण वर्गाला शासकीय नौकरीची संधी मिळाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष** :—

किनवट—माहुर परिक्षेत्रातील आदिवासी मुलां—मुलींना शासनाच्या विकास योजनांचा लाभ मिळाला. कौशल्या विकासाच्या कार्यक्रमाचा परिणाम दिसून दिसून येते. अज्ञानाचे प्रमाण कमी झालेली दिसून येते. अनेक अंधश्रध्द, रूढी, परंपरा कालबाहय झालेल्या दिसून येतात.राजकिय क्षेत्राता अनेक आदिवासी नेतृत्व पुढे येताना दिसून येते. हे शासनाच्या विविध योजनांचा परिपाक आहे.

भारत सरकार आणि व शासनाच्या विविध कल्याणकारी शैक्षनिक योजनांच्या माध्यमातून आदिवासी जमातीत शिक्षणानाचे प्रमाण वाढले रोजगारच्या संधी निर्माण झाला. वैधकीय आणि अभियांत्रीकी तांत्रिक शिक्षणामुळे त्यांचा सामाजिक राजकिय धार्मिक सांस्कृतिक विकासास चालना मिळाल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथसुची** :—

१. काचोळे दा.धो.— भारतीय समाज प्रश्न आणि समस्या कैलास पब्लिकेशन औरंगाबाद. २००५, प्र.आ.

२. पाटील पी.बी.— मानव संशोधन विकास, के सागर पब्लिकेशन, पुणे,२०१२

३. कुमरे मंसाराम— गोंडवश का इतिहास एंव संस्कृती विश्वभारती प्रकाशन नागपुर, प्र. संस्करण २०१४

४. देवगावकर डॉ.एस.जी.सौ. शैलेजा: गोंड परधान आणि कोलाम, श्री. साईनाथ प्रकाशन नागपुर.

५. साळंखे संजय गोंड संवेदन प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२००२

६. देव प्रभाकर डॉ. इतिहास संशोधन स्वरूप प्रक्रिया कल्पना प्रकाशन नांदेड प्र.आ.२०१०

७. कुमरे मंसाराम : गोंडवंश का इतिहास एंव संस्कृती विश्व भारती प्रकाशन नागपुर प्र.संस्करण २०१४

८. योजन केंद्र शासन मासिक.

९. विकिपीडीया :

❑❑❑